# प्रेस नोट

दि. २०.०६.२०२३

**( आरोपी ग्रामसेवक परशुराम गायकवाड दुस—यांदा लातुर एसीबीच्या जाळयात )**

**आरोपी परशुराम पंढरी गायकवाड, वय ५० वर्ष, पद — ग्रामसेवक, ने. पंचायत समिती, चाकुर, ग्रामपंचायत बोथी ता. चाकुर जि. लातुर सध्या रा. शाहुनगर, थोडगा रोड, अहमदपुर ता. अहमदपुर जि. लातुर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून रंगेहात पकडल्याने गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवक परशुराम पंढरी गायकवाड, वय ५० वर्ष, ग्रामसेवक यातील तक्रारदार यांना, त्यांचा एमजीनरेगा अंतर्गत अहिल्यादेवी सिंचन विहीरीचा प्रस्ताव पंचायत समिती चाकुर येथे दाखल केल्याचा मोबदला तसेच यापुढे सिंचन विहीर मंजुर होण्यासाठीच्या कामात मदत करण्यासाठी म्हणुन आलोसे ग्रामसेवक परशुराम गायकवाड यांनी ३,०००/— रू.ची लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि. १९/०६/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि. २०/०६/२०२३ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, वरील प्रमाणे प्राप्त तक्रारी नुसार आलोसे ग्रामसेवक परशुराम गायकवाड यांनी तक्रारदारास पंचासमक्ष ३,०००/— रूपयाची लाचेची मागणी केल्याचे लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

त्यानुसार आज दि. २०/०६/२०२३ रोजी तक्रारदार हे आलोसे ग्रामसेवक परशुराम गायकवाड यांना चाकुर बस स्टॅंड येथील कॅन्टीन मध्ये ११.४५ वा. सुमारास लाच मागणी केलेली रक्कम ३,०००/— रू देण्यासाठी गेले असता आलोसे गायकवाड यांनी लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्विकारली. त्यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच रंगेहाथ पकडण्यात आले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आलोसे ग्रामसेवक परशुराम गायकवाड यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन चाकुर, जि. लातूर, जि.लातूर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रकिया चालु आहे. सदर गुन्हयात तपास पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि.लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पोह/फारूक दामटे, भागवत कठारे, शाम गिरी, भिमराव आलुरे, पोना/संतोष गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, मपोकॉ/रूपाली भोसले पोकॉ/संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील कमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :— | मोबाईल कमांक ०९६२३९९९९४४ |
| २) | श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :— | मोबाईल कमांक ०९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री | :— | १०६४ |
| ४) | हेल्पलाईन कमांक कार्यालयाचा फोन कमांक | :— | ०२४८२—२४२६७४ |
| ५) | Website | :— | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :— | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :— | www.facebook.com/MaharashtraACB |
| ८) | Twitter | :— | ACBlatur |
| ९) | Instagram | :— | Acblatur |
| १०) | YouTube Channel | :— | @anticurruptionbureaulatur1584 |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with CamScanner